# मा. मंत्री (वित्त, नियोजन आणि वने) श्री. सुधीर मुनगंटीवार यांनी शनिवार, दिनांक १८ मार्च २०१७ रोजी केलेल्या अर्थसंकल्पीय भाषणाची ठळक वैशिष्ट्ये

## भाग–दोन

### (अ) मूल्यवर्धितकर सवलत

१. शेतकऱ्यांना रास्त व किफायतशीर भाव देता यावा याकरिता सन २०१६-१७ चा ऊस खरेदी कर माफ. सन २०१५-१६ च्या ऊस खरेदी करमाफीसाठीची साखर निर्यात अट काढण्यात आली.

२. जीवनावश्यक वस्तू जसे तांदूळ, गहू, डाळी व त्यांचे पीठ तसेच हळद, मिरची, चिंच, गूळ, नारळ, धणे, मेथी, सुवा, पापड, ओला खजूर यांचेवरील करमाफी सुरु ठेवणार. आमसुलास नव्याने करमाफी.

३. सोलापुरी चादर व टॉवेलवरील करमाफी सुरु ठेवणार.

४. शेततळ्याकरिताचे जीओ मेमब्रेनवरील कर ६% वरुन ०%.

५. शेत जमिनीची उत्पादकता तपासण्याकरिता सॉईल टेस्टींग किटवरील विक्रीकराचा दर १३.५% वरुन ०%.

६. दुधातील भेसळ तपासण्याकरिता मिल्क टेस्टींग किटवरील विक्रीकराचा दर १३.५% वरुन ०%.

७. रिजनल कनेक्टीव्हीटी स्कीम अंतर्गत शहरांच्या विमान वाहतुकीस इंधनाचा कर दर ५% वरुन १%.

८. कॅशलेस व्यवहाराकरिता कार्ड स्वाईप मशीनवरील कर १३.५% वरुन ०%.

९. गॅस व विद्युत दाहिनीवरील कराचा दर १३.५% वरुन ०%.

### (ब) उद्योगास कर सवलत

१. मधुमका प्रक्रिया उद्योगावरील दिनांक १ एप्रिल २००५ ते ३१ मार्च २०१६ पर्यंत विक्रीकर माफ.

२. कापड प्रक्रिया उद्योगावरील मूल्यवर्धित कर दिनांक ८ एप्रिल २०११ ते ३० एप्रिल २०१२ या कालावधीकरिता माफ. अंदाजित २०० उद्योगांस फायदा.

३. यार्न सायझिंग व वार्पिंग उद्योगांवरील मूल्यवर्धित कर दिनांक १ एप्रिल २००५ ते ३१ मार्च २०१६ पर्यंत माफ. अंदाजित ३०० उद्योगांस फायदा.

(क) **करवृद्धी**

१. देशी व विदेशी मद्यावरील कमाल विक्री किंमतीवर मूल्यवर्धित कराचा दर २३.०८% वरून २५.९३%.

२. साप्ताहिक लॉटरीवरील कर रु. ७०,००० वरून रुपये १ लक्ष.

(ड) **प्रशासकीय बदल**

१. महाराष्ट्र विक्रीकर न्यायाधिकरणाच्या तीन नवीन खंडपीठांची निर्मिती.

२. मूल्यवर्धित कर कायद्याअंतर्गत अपील दाखल करण्याकरिता रुपये १५ कोटी अधिकतम मर्यादेत १०% अंशत: रकमेची आवश्यकता.

३. खाजगी कंपनीच्या संचालकांकडून कंपनीची मूल्यवर्धित कराची थकबाकी वसूल करता येणार.

४. व्यवसाय कराअंतर्गत अनोंदीत कालावधीसाठी कराची आकारणी ४ वर्षांपर्यंत सीमित.

५. एजंटची व्यवसाय कराची जबाबदारी त्यास नेमणाऱ्या संस्थेवर.

६. विविध कायद्याअंतर्गत असलेल्या शुल्क, दंड व कोर्ट फी रकमेचे पुनर्निरीक्षण.

(इ) **जीएसटी**

१. जीएसटी अंमलबजावणीकरिता राज्याची पूर्ण तयारी.

२. जीएसटी अंतर्गत सन २०१५-१६ च्या कर जमा महसुलावर वार्षिक १४% वाढीवर आधारित नुकसानभरपाई मिळणार.

३. जीएसटी अंतर्गत मुंबईच्या जकात व स्थानिक संस्था कराची नुकसानभरपाई मिळणार.

*****